Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण

**संदिप रामनाथ कोते,**
**छात्राध्यापक (एम्. फिल्.)**
**ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.**

अन्न, वस्त्र आणि निवारा यासोबत पर्यावरण विषयक जागरुकता हि सुद्धा हल्लीच्या काळातील जीवनावश्यक गरज ठरलेली आहे. केवळ सध्याच्या मानवी पिढीचे नव्हे तर पुढच्याही पिढीचे जीवन हलाखीचे होण्याची लक्षणे जगभर जाणवू लागलेली आहेत. पर्यावरणरक्षणाचा संबंध केवळ आपल्याला होणारे प्रदुषणाचे त्रास किंवा साधनसंपत्तीचा तुटवडा यासारख्या समस्यांपुरता मर्यादित नाही. पुढील पिढयांच्या जीवनाशी त्याचा जवळचा संबंध आहे. पर्यावरणक्षम आणि संवर्धनसाठी संपूर्ण जगभर पोटतिडिकेने सुरु असलेल्या प्रयत्नांमागील हेच महत्वाचे कारण आहे. पर्यावरणविषयी संवेदनशीलता, आवश्यक बदल किंवा सुधारणा यांचा विचार करण्याची क्षमता आणि त्यासाठी स्वतः पुढाकार घेउन कृतीशील होण्याची मनोवृत्ती याशिवाय पर्यावरण विषयक जागरुकता अशक्य आहे. म्हणुनच बालवयापासुन पर्यावरण शिक्षण ही काळाची गरज आहे.

**पर्यावरणाची व्याख्या :-**

१. **डॉ. आर. सी. शर्मा (युनेस्को विशेषतज्ञ)-** विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी ज्ञान देणे, त्यांच्याजवळ पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक दृष्टीने निर्माण करणे याबाबतची जागृतीची प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

२. **डॉ. भांडारकर के.एम. –**शिक्षणाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती, ज्ञान, पर्यावरण संगत हितकारक कृतिशीलता निर्माण करणे याबाबतची जागृती प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

**पर्यावरण शिक्षण संकल्पना :**

पर्यावरण शिक्षण ही एक अत्याधुनिक संकल्पना असुन या संकल्पनेच्या उगम सामाजिक आणि राष्ट्रीय गरजांमधून इ.स. १९६० च्या सुमारास झाला. पर्यावरण अभ्यास या ज्ञानशाखेचा पर्यावरण शिक्षण हा नवोपक्रम आहे.

मनुष्य जातीला पाषाण युगापासुन आजच्या इलेक्ट्रानिक्स युगापर्यंत पोचविण्याचे श्रेय निःसंशयपणे शिक्षणाला जाते. शिक्षणाने पदोपदी मनुष्य जातीला मदत केली आहे व सर्व प्रकारच्या समस्यांचे समाधान शोधुन दिले आहे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, हे सत्य सर्वांनाच माहित आहे. जगभरात चिंताजनक रूप धारण केलेल्या पर्यावरण विषयक समस्यांवर मात करण्याचे एकमात्र प्रभावी साधन म्हणजे शिक्षणच होय. या जाणीवेतून पर्यावरण शिक्षणाची संकल्पना उदयास आली.

**पर्यावरण शिक्षण संकल्पनेतील घटक :**

| | | |
|---|---|---|
| परिसर | प | परिसंस्था |
| राष्ट्रीय-आंतर | र्या | मनुष्य-जीवन |
| हवामान | व | वन्य जीवन |
| भौगोलिक स्थिती | र | लोकसंख्या |
| शहरीकरण | ण | लोकसंख्या विस्फोट |
| मानसिक आरोग्य | शि | औद्योगिकरण |
| नैतिक-धार्मिक | क्ष | प्रदुषण |
| सामाजिक सांस्कृतिक | ण | स्वास्थ्य |

**पर्यावरण शिक्षणाची व्याप्ती :**

पर्यावरण शिक्षणची व्याप्ती सतत वाढत असून पर्यावरण शिक्षण हे सर्व विषयांशी संबंधित शास्त्र आहे. त्यांच्या ज्ञान कक्षेत सतत वाढ होत असून त्याची व्याप्ती ही सर्वस्पर्शी, सर्वकष व सर्व शास्त्रांच्या दृष्टीने उपयूक्त, तसेच व्यक्तींच्या जीवन कक्षा रुंदावण्यास जीवनाचे व पर्यावरणाचे मोल समजून घेण्यास उपयुक्त ठरले आहे.

भारतात शालेय स्तरापासून विद्यापीठ स्तरापर्यंत पर्यावरण शिक्षण देण्यास सुरूवात झालेली आहे. तरी ही या विषयाची व्याप्ती वाढविताना सर्वत्र पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात प्रत्यक्ष सहभागाची, कृतीची गरज आहे. त्यादृष्टीने ही व्याप्ती पूढील मूद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

IIJS Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**पर्यावरण शिक्षण व्याप्ती**

- सहकार्य करण्यास उत्तेजन
- व्यवस्थापन क्षमता
- विविध कौशल्य
- शोधक बुद्धी व कौशल्य
- विविध घटकांचे ज्ञान
- नियोजन व व्यवस्थापनाचे मार्ग
- परस्पर संबंधाचा अभ्यास
- सलग-सतत चालणारी प्रक्रिया
- शाश्वत समृद्धीकडे वाटचाल
- परीक्षण करण्याची क्षमता
- पर्यावरण संवर्धन कार्याचे नियोजन

**पर्यावरण शिक्षणाचे स्वरूप :**

UNISCOव UNEPयांनी १९७७ मध्ये पर्यावरण विषयक जोर्जिया मधील तबिलसी येथे भरविलेल्या परिषदेमध्ये पर्यावरण-शिक्षणाचे स्वरूप पुढील प्रमाणे


प र्या व र ण शि क्ष णा चे स्व रू प

- पर्यावरणाचा साकल्याने विचार
- अनौपचारीक व औपचारीक स्तरावर अंतर्भाव
- आंतरविद्याशाखीय उपागम
- पर्यावरणीय समस्यांचे यथायोग्य आकलन
- भविष्यकालीन परिस्थितीवर प्रकाश
- मूल्य रूजवणूक
- विकास व वाढीच्या नियोजनात विचार
- निर्णय घेण्याची संधी
- पर्यावरणविषयक संवेदनशीलतेवर भर
- विविध कौशल्यांचा विकास
- चिकित्सक दृष्टिकोन
- नवीन पद्धतीचा शोध
- मूल्यांची नवी प्रणाली प्रस्थापणे.
- प्रत्यक्ष कृती व प्रत्यक्ष अनुभवावर भर

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**६) पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व :**

पर्यावरणातच मानवाचा जन्म झाला. भारतीय संस्कृतीमध्ये पर्यावरणास महत्त्वाचे स्थान दिले आहे. पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व आपणास खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.




**पर्यावरण समतोलासाठी समाज सहभाग :**

सध्या अनेकजण निसर्गाचा समतोल पुन्हा साधला जावा म्हणून प्रयत्नशील आहेत. उदा ‘देवराई ही पर्यावरण करणारी संस्था असाच समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे पर्यावरणाच समतोल पुढीप्रमाणे राखला आहे.

१) लहान वनस्पतीपासून महाकाय वृक्षांपर्यत अनेक वनस्पती देवराईत मानवी हस्तक्षेपासून सुरक्षित असतात.

२) विविध प्रकारच्या वनस्पती या विविध प्राणी व पक्षी यांचे आश्रयस्थान बनतात.

३) देवराईत जमिनीची धूप न झाल्याने मृदेचे संरक्षण होते व जमिनीत पाणी मुरत जाऊन तेथील पाण्याची पातळी वाढते.

४) झाडांची नैसर्गिक वाढ झाल्याने वनस्पतीच्या विविध प्रकारांची संतुलित वाढ होते.

५) जैवविविधता जपली जाते.

६) वनस्पतीमुळे हवा शुद्ध राहते.

७) वनस्पतीच्या मृतावशेषांचे नैसर्गिकरित्या खत तयार होते व त्यामुळे झाडांची उत्तम वाढ होते.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

८) देवराईत क्षारांचे प्रमाण बाह्य भागापेक्षा जास्त असते.

अशाप्रकारे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न केले जातात.

या बरोबरच पर्यावरण संतुलनासाठी समाजाचा सहभाग घेण्यासाठी खालील उपक्रम राबविता येतील.

१) शेतीचे महत्त्व पटवून देणे.

२) नागरिकरणाची सीमा निश्चित करणे.

३) सामाजिक सहकार्यातून वृक्षतोड थांबविणे.

४) पर्यावरण जागृतीसाठी सामाजिक चर्चासत्राचे आयोजन करणे.

५) कृत्रिम खते, कीटकनाशके, जंतूनाकशे यांचा रासायनिक स्वरूपातील बेसुमार वापर रोखण्यासाठी कृषीतज्ञांचे उद्‌बोधनपत्र व्याख्यान आयोजित करणे.

६) शाळेमध्ये गांडूळखत प्रकल्प तयार करून असे प्रकल्प प्रत्येक शेतकऱ्यांनी राबवावेत यासाठी माहिती देणे. प्रशिक्षण देणे.

७) शाळेमार्फत गावात वृक्षारोपन कार्यक्रमांचे आयोजन करणे.

८) अपारंपारिक ऊर्जास्त्रोतांच्या वापराबाबत समाज जागृती करणे.

९) गावाशेजारची गावठाण पडीक जमीन, स्मशाभूमीची जमीन याठिकाणी ग्रामसहकार्यातून वृक्षारोपण करणे.

१०)पर्यावरण संतुलनासाठी शासनाने तार केलेले माहितीपट समाजाला दाखविणे.

११)विद्यार्थ्यांच्या पालकांची सहल काढणे. उदा. राळेगणसिद्दी, हिवरे बाजार.

१२) ग्रामसुदायातून पाणी-अडवा, पाणी-जिरवा ही मोहिम राबविणे.

जंगली प्राण्यांची(वाघ, काळवीट, हरीण, चिंकारा, ससे) शिकार न करण्याबाबत गावात ठराव मंजूर करून घेणे.

**पर्यावरण शिक्षणात शिक्षकाची भूमिका :**

२१ व्या शतकातील शिक्षकांची प्रमुख जबाबदारी म्हणजे पर्यावरण शिक्षणविषयक विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती करून या विचारशिलतेचे अधिष्ठान देणे होय. या कार्याच्या पुर्णत्वासाठी पर्यावरण शिक्षक म्हणून शिक्षकाला विविध भूमिका पार पाडणे गरजेचे आहे.

→ १) मार्गदर्शक
→ २) समुपदेशक
→ ३) मित्र
→ ४) व्यवस्थापन
→ ५) संशोधक
→ ६) समाजपरिवर्तक

पर्यावरणविषयक क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्था ठिकठिकाणी अस्तित्वात आहेत. आपापल्या क्षेत्रामध्ये या संस्थांचे विविध उपक्रम, योजना सुरू असतात. आपल्या परिसरातील अशा संस्थांची केवळ माहिती विद्यार्थ्यांनाच असण्यापेक्षा या संस्थांच्या साहाय्ययाने आपल्या परिसरातही काही उपक्रम सुरू होणे हे आपल्या प्रयत्नांचेच यश असणार आहे. शेती, आरोग्य, जलसंवर्धन, मृदासंरक्षण यासारखी अनेक क्षेत्रे आपल्या प्रयत्नांची वाट पाहत आहेत. चला तर प्रारंभ करू या विद्यार्थ्यांची पर्यावरणविषयक संवेदना, डोळसपणा जागृत करण्याचा प्रयत्नांना.

**संदर्भसूची :**

**१)** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (२००६) पर्यावरण शिक्षण हस्तपुस्तिका.

**२)** सावंत प्र. (२०१०) पर्यावरण शिक्षण, कोल्हापूर : फडके प्रकाशन

**३)** शेंडकर, ढगे (२०१२) पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन, सृष्टी प्रकाशन